Kind atten - Mr. Ganga Kumar Vishpoas

माध्यमिक शालांत शिकत असलेल्या मागासवर्गीय विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती प्रदान करणे.

अंमलबजावणीबाबत मार्गदर्शक सूचना.

महाराष्ट्र शासन.
समाजकल्याण सांस्कृतिक कार्य व क्रीडा विभाग,
शासन परिपत्रक क्र. विसशला. ५०९११/इबीसी. १०९७/७७२/प्रक्र. २१/
मावक- २.
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई- ४०० ०३२
दिनांक- १२ फेब्रुवारी- १९९८.

वाचा : शासन निर्णय समाजकल्याण सांस्कृतिक कार्य व क्रीडा विभाग क्र. इबीसी. १०९४/प्रक्र. १०९/मावक. २, दिनांक- १७ ऑगष्ट- १९९५.

परिपत्रक माध्यमिक शालांत इयत्ता ५ वी ते इयत्ता १०वी मध्ये शिकत असलेल्या हुशार व गुणवत्तापूर्ण मागासवर्गीय विद्यार्थ्यांसाठी शिष्यवृत्ती प्रदान करणे बाबतची सुधारित योजना शासन निर्णय क्र. इबीसी. १०९४/प्रक्र. १०९/मावक. २, समाजकल्याण सांस्कृतिक कार्य व क्रीडा विभाग, मंत्रालय, दिनांक- १७ ऑगष्ट- १९९५ अन्वये कार्यान्वित करण्यात आलेली आहे. या योजनेनुसार इयत्ता ५वी ते इयत्ता १०वी मध्ये ५०% हुन अधिक गुण मिळविणाऱ्या पहिल्या दोन मागासवर्गीय विद्यार्थ्यांना ही शिष्यवृत्ती दिली जाते. ही शिष्यवृत्ती विहीत वेळेत मागासवर्गीय विद्यार्थ्यांना मिळावी, याबाबत शासनस्तरावर विचार करुन या शिष्यवृत्तीच्या योजनेच्या प्रभावी अंमलबजावणीबाबत खालील-प्रमाणे मार्गदर्शक सूचना सर्व संबंधितांना देण्यात येत आहेत.

१] माध्यमिक शाळांतील वार्षिक परीक्षा झाल्यानंतर विद्यार्थ्यांचे निकाल साधारणत: एप्रिल महिन्याअखेर दिले जातात व पुढील शैक्षणिक वर्षी म्हणजे जूनपासून शाळा सुरु होतात. तेव्हा मागील वर्षाचे निकालानुसार इयत्ता ५ वी ते इयत्ता १०वी या वर्गामधील मागील वार्षिक परिक्षेत कमीत- कमी ५०% व त्याहुन अधिक गुण मिळवून प्रथम व द्वितीय क्रमांकात उत्तीर्ण होणाऱ्या पहिल्या दोन मागासवर्गीय [अनुसूचित जाती, विमुक्त जाती व भटक्या जमाती- [धनगर व वंजारी सह] आणि विशेष मागास प्रवर्ग.] विद्यार्थ्यांची नावांची यादी सर्व माध्यमिक शाळांनी/संस्थांनी संबंधित जिल्ह्याचे समाजकल्याण अधिकारी जिल्हा परिषद यांचे कार्यालयाकडे न चुकता प्रत्येक वर्षी जुलैअखेर पाठवावी.

२] सर्व जिल्ह्याचे समाजकल्याण अधिकारी, जिल्हा परिषद यांनीही संबंधित जिल्ह्यांतील सर्व माध्यमिक शाळा/सर्व संस्थांकडून ही यादी न चुकता प्राप्त करुन घ्यावी.

३] सर्व संबंधित समाजकल्याण अधिकारी, जिल्हा परिषद यांनी अशा प्राप्त करुन घेतलेल्या यादीनुसार सर्व पात्र विद्यार्थ्यांचे शिष्यवृत्ती संबंधीचे धनादेश सर्व संबंधित शाळाप्रमुखांकडे/संस्थांकडे ऑगष्ट अखेर सुपूर्द करावेत.

४] सर्व संबंधित माध्यमिक शाळा प्रमुखांनी/संस्थांनी शिष्यवृत्तीची रक्कम सर्व संबंधित शिष्यवृत्ती पात्र विद्यार्थ्यांना सप्टेंबर अखेरपर्यंत न चुकता वाटप करावी व त्याची पोच पावतीची प्रत [संबंधित शिष्यवृत्ती मिळाल्याचे विद्यार्थ्यांचे सही-स्वाक्षरी शिष्यवृत्ती प्राप्त झालेल्या दिनांकासहीतची स्थळ प्रतीची प्रत संबंधित समाजकल्याण अधिकारी, जिल्हा परिषद यांचे कार्यालयाकडे सप्टेंबरचे अखेरीस न चुकता पाठवावी.

५] सर्व संबंधित माध्यमिक शाळा प्रमुखांनी/संस्थांनी ह्या सर्व शिष्यवृत्तीच्या रकमेचे वाटप सर्व संबंधित पात्र विद्यार्थ्यांना केले आहे किंवा नाही. हे तपासणीचे काम सर्व संबंधित जिल्ह्याचे समाजकल्याण अधिकारी, जिल्हा परिषद यांचे कार्यालयाने ऑक्टोबरचे १५ तारखेपर्यंत पूर्ण करून त्याबाबतचा आपला अहवाल संबंधित जिल्हा समाजकल्याण अधिकारी, विभागीय समाजकल्याण अधिकारी, आणि संचालक, समाजकल्याण, पुणे. यांचेकडे ऑक्टोबर अखेरपर्यंत न चुकता पाठवावा.

६] वरील सर्व सूचनांची सर्व संबंधितांनी काटेकोरपणे अंमलबजावणी करावी व कुठल्याही पात्र विद्यार्थी शिष्यवृत्तीपासून वंचित राहणार नाही, याची काळजी घेण्यात यावी.

७] शासन निर्णय क्रमांक- इबीसी. १०९४/प्रक्र. १०९/मावल. २, समाजकल्याण सांस्कृतिक कार्य व क्रीडा विभाग, दि. १७ ऑगष्ट- १९९५ अन्वये लागू करण्यात आलेली शिष्यवृत्तीची योजना सन- १९९८ या शैक्षणिक वर्षापासून अनुसूचित जाती विमुक्त जाती, व भटक्या जमाती [धनगर, वंजारीसह] आणि विशेष मागासप्रवर्ग विद्यार्थ्यांसाठी समाजकल्याण सांस्कृतिक कार्य व क्रीडा विभागाकडून राबविली जाईल व अनुसूचित जमातीचे विद्यार्थ्यांकरिता आदिवासी विकास विभागाकडून राबविली जाईल.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

सही/-
[जे. पी. डांगे.]
सचिव, समाजकल्याण.

प्रति

संचालक, समाजकल्याण महाराष्ट्र राज्य, पुणे.
संचालक, [शिक्षण] महाराष्ट्र राज्य, पुणे.
उपसंचालक, शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे.
सचिव, आदिवासी विकास विभाग, मंत्रालय, मुंबई, [शासन निर्णय दि. १७. ८. ९५ चे प्रतीसह.]
सचिव, शालेय शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई [परिपत्रकातील अनुक्र. १व४येथील सूचनेस अनुसरून सर्व संबंधितांना योग्य ते आदेश निदेश देण्याचे संदर्भात.].
सर्व विभागीय समाजकल्याण अधिकारी,
सर्व जिल्हा समाजकल्याण अधिकारी.
सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद.
सर्व समाजकल्याण अधिकारी, जिल्हा परिषद,
महालेखापाल, महाराष्ट्र- १/२ [लेखा परिक्षा/लेखा व अनुज्ञेयता] मुंबई/नागपूर.

परिपत्रकातील अनुक्रमांक १व४ येथील सूचनेस अनुसरून सर्व संबंधितांना योग्य ते आदेश/निदेश देण्याचे संदर्भात.]